विकास योजना- कोल्हापूर (दु.सु)
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ (२) अन्वये फेरबदल मंजूर करणेबाबत.**

ए. वार्ड. कोल्हापूर, कसबा-करवीर येथील रि.स.नं.११०४ (पैकी), या भूखंडावरील **१८ मी. विकास योजना रस्ता"** रद्द करुन त्याऐवजी **रंकाळा सांडवा** असा फेरबदल करणेबाबत...

# अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**

**शासन निर्णय क्रमांक** :- टिपीएस- २११७/१७७९/प्र.क्र.२९/१८/नवि-१३.
**दिनांक :-३१/०५/२०१८.**

**शासन निर्णय** :- सोबतची शासकिय **अधिसूचना** महाराष्ट्र शासन साधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**
१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव.
२) मा.राज्यमंत्री, नगर विकास, यांचे खाजगी सचिव.
३) मा.प्रधान सचिव, (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**
४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
६) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

७) जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
८) सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर.
९) आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.

/-त्यांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी मंजूर अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाचे नकाशे ५ प्रतींत शासनास विहित मार्गाने सत्वर सादर करावेत.

१०) सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
११) व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यांत येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन साधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती शासनास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे, जिल्हाधिकारी, कोल्हापूर, सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर व आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांना पाठवाव्यात.

१२) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१३) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

१४) निवड नस्ती (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32 सत्यमेव जयते

# अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:-३१/०५/२०१८.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

**क्र.टिपीएस-२११७/१७७९/प्र.क्र.२९/१८/नवि-१३.** :- ज्या अर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम-३७ वा) (यापुढे **"उक्त अधिनियम"** असा उल्लेख करण्यात आला आहे.) कलम ३१(१) अन्वये कोल्हापूर शहराची दुसरी सुधारीत विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" असा उल्लेख केलेलो ) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२१९२/२३६८/सीआर-१३५/९२/युडी-१३, दि.१८/१२/१९९९ अन्वये मंजूर केली असून ती दि. ०१/०२/२००० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त विकास योजनेसाठी "कोल्हापूर महानगरपालिका" हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, ए, वार्ड, कोल्हापूर, कसबा-करवीर येथील रि.स.नं. ११०४ (पैकी) ही जागा **१८ मी. विकास योजना रस्त्याचे आखणीने बाधित होत आहे.** (यापुढे "उक्त जागा " असे संबोधिले आहे) ;

आणि ज्या अर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १४२, दि. २०/०५/२०१६ अन्वये उक्त जागा **१८ मी विकास योजना रस्ता** या आरक्षणामधून वगळून आणि त्याऐवजी उक्त जागेचे क्षेत्र " **रंकाळा सांडवा** " या प्रयोजनाकरिता आरक्षित करणेचे ठरवून (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) व उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा फेरबदल प्रस्ताव दि. २०/०६/२०१६ चे पत्रान्वये शासनाचे मान्यतेसाठी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर उक्त जागा **१८ मी विकास योजना रस्ता** या आरक्षणामधून वगळून त्याऐवजी **"रंकाळा सांडवा"** या प्रयोजनाकरिता आरक्षित ठेवणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास मंजूरी देत आहे आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलांच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निदेश देत आहे :-

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

"**नोंद**

सोबतच्या नकाशावर दर्शविल्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेच्या दुसऱ्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील ए. वार्ड, कोल्हापूर, कसबा-करवीर येथील रि.स.नं.११०४ (पैकी), या भूखंडावरील प्रस्तावित **१८ मी. विकास योजना रस्त्याची आखणी** " रद्द करुन त्याऐवजी उक्त जागा **रंकाळा सांडवा** " या प्रयोजनाकरिता आरक्षित ठेवण्यात येत आहे. सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण कोल्हापूर महानगरपालिका राहील :-

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा क्र.**टिपीएस-२११७/१७७९/प्र.क्र.२९/१८/नवि-१३.** हा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांचे कार्यालयात एक महिन्याच्या कालावधीसाठी, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात यावा.

सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(रा.म.पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

# NOTIFICATION

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated :31/05/2018**

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

**No.TPS-2117/1779/C.R.29/18/UD-13:** Whereas the Government in Urban Development Department vide Notification, No.TPS-2192/2368/C.R.-135/92/UD-13, dated 18/12/1999 has approved the Second Revised Development Plan of Kolhapur Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Development Plan") under section 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same has come into force with effect from 01/02/2000 ;

And whereas, the "Kolhapur Municipal Corporation" is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority");

And whereas, as per the said Development Plan, the land bearing R.S.No.1104 (Pt), of A-Ward , Kolhapur (hereinafter referred to as "the said land") is affected by the 18 mt wide Development Plan Road ;

And whereas, the said Planning Authority, vide its General Body Resolution No.142, dated the 20/05/2016, resolved to delete the said land from "**18 mt wide Development Plan Road**" and proposed to be reserved for the purpose of **"Rankala Sandva "**,(hereinafter referred to as "the Proposed Modification") and for that purpose, after following all the legal formalities stipulated under Section 37(1) of the said Act, the said Planning Authority, vide letter dated the 20/06/2016, has submitted the proposed Modification to the Government for it's Sanction;

And whereas after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that, the said land should be deleted from **"18 mt wide Development Plan Road"** and reserved for the purpose of **"Rankala Sandva "** ;

Now therefore, in exercise of powers conferred by sub-section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby Sanctions the proposed Modification and for that purpose directs that, in the Schedule of Modifications appended to the said Notification, after the last entry, the following new entry shall be added viz.:-

"*ENTRY*

Allignment of proposed **"18 mt wide Development Plan Road"** from the Second Revised Sanctioned Development Plan of Kolhapur Municipal Corporation passing through the Land bearing R.S.No.1104 (Pt),of A-Ward , Kasba Karvir, Kolhapur, is deleted and the said land is reserved for the purpose of **"Rankala Sandva "** as shown on Plan .The appropriate Authority to the reservation will be the Kolhapur Municipal Corporation.

The Part Plan, bearing No.TPS-2117/1779/C.R.29/18/UD-13 showing the above Sanctioned Modification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Commissioner, Kolhapur Municipal Corporation, Kolhapur for a period of one month.

This Notification shall also be published on the Government website - www.maharashtra.gov.in. (कायदे व नियम)

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

**(R.M.Pawar)**
**Under Secretary to Government.**